लोकमत पान क्र. 1

नांदेड लोकसभेसाठी २० नोव्हेंबर, वायनाडसाठी १३ ला मतदान; दिवाळीच्या आधी आणि नंतरही वाजणार प्रचाराचे फटाके

# राज्यात एकाच टप्प्यात सत्तेचा फैसला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अखेर महाराष्ट्रातील बहुप्रतिक्षित विधानसभा निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. प्रचाराचे फटाके दिवाळीच्या आधी सुरू होतील आणि दिवाळी संपल्यानंतर अधिक जोमाने वाजतील. दोन टप्प्यांत निवडणुका होतील, असे धुरंधर अंदाज व्यक्त होत होते. मात्र, राज्यात एकाच टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होईल. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होतील. वेगवेगळ्या कारणांमुळे महाराष्ट्रातील निवडणुकीकडे अख्ख्या देशाचे लक्ष लागले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी मंगळवारी झारखंड विधानसभा निवडणुकांचीही घोषणा केली. १३ नोव्हेंबर व २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांत झारखंडमध्ये निवडणुका पार पडतील व मतमोजणी २३ नोव्हेंबरलाच होईल. या घोषणेसोबतच दोन्ही राज्यांत निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे.




## मुख्य निवडणूक आयुक्तांनी पेश केले दोन शेर...

१. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकांबाबत - **जम्हूरियत के जश्न में आपकी शिरकत, दुनिया देखेगी नापाक इरादों के शिकस्त की कहानी**

२. ईव्हीएमबद्दल असलेल्या तक्रारींविषयी - **कुछ तो लोग कहेंगे, लोगों का काम है कहना**

## रश्मी शुक्ला यांच्या बदलीबाबत...

पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या बदलीच्या मागणीसंदर्भात राजीवकुमार म्हणाले की, पोलीस महासंचालकांची निवड यूपीएससी करते. प्रकाश सिंग खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने काही निर्देश दिले होते. त्या अधीन राहून निर्णय घेऊ.

## सर्व प्रमुख नेत्यांची अस्मिता पणाला



### सध्याचे संख्याबळ असे... एकूण जागा -२८८

| | | | |
|---|---|---|---|
| भाजप | १०३ | स्वाभिमानी पक्ष | १ |
| शिंदेसेना | ३९ | शेकाप | १ |
| अजित पवार गट | ३९ | रासप | १ |
| काँग्रेस | ३७ | माकप | १ |
| उद्धवसेना | १५ | क्रांशेपा | १ |
| शरद पवार गट | १२ | जनसुराज्य शक्ती | १ |
| बविआ | ३ | अपक्ष | १३ |
| समाजवादी पार्टी | २ | रिक्त | १४ |
| एमआयएम | २ | | |
| प्रहार जनशक्ती | १ | | |
| मनसे | १ | | |

**(अजित पवार गटातून बाहेर पडलेले बबन शिंदे सध्या कोणत्याही पक्षात नाहीत.)**

### हिंसाचाराविरोधात कडक कारवाई

१ निवडणुकांमध्ये हिंसाचाराविरोधात विशेषत: राजकीय नेत्यांविरोधातील हिंसाचाराविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी दिला. मुंबईत अजित पवार गटाचे नेते व माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या झालेल्या हत्येच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे उद्गार काढले.

२ कोणत्याही प्रकारचा हिंसाचार निवडणूक आयोग खपवून घेणार नाही, असे पोलिसांना सांगण्यात आले आहे. हिंसक कारवाया करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे राजीवकुमार यांनी सांगितले.

सुपर व्होट पान /- एक्झिट पोलविरोधात कडक कारवाई करण्याची गरज

## झारखंडमध्ये दोन टप्पे

| टप्पा १ | टप्पा २ | निकाल |
|---|---|---|
| नोव्हेंबर | नोव्हेंबर | नोव्हेंबर |
| १३ | २० | २३ |

**जिल्हे - २४ । जागा - ८१ । मतदार - २.६ कोटी**

| सत्तारूढ महागठबंधन | | एनडीए | |
|---|---|---|---|
| झारखंड मुक्ती मोर्चा | २७ | भाजप | २४ |
| काँग्रेस | १८ | आजसू | ३ |
| राजद | १ | अजित पवार गट | १ |
| माकप | १ | अपक्ष, अन्य | ६ |

### असा आहे निवडणूक कार्यक्रम

| | पहिला टप्पा | दुसरा टप्पा |
|---|---|---|
| अधिसूचना | १८ ऑक्टोबर | २२ ऑक्टोबर |
| अर्जाची अंतिम तारीख | २५ ऑक्टोबर | २९ ऑक्टोबर |
| परत घेण्याची अंतिम तारीख | ३० ऑक्टोबर | १ नोव्हेंबर |
| प्रचार तोफा थंडावणार | ११ नोव्हेंबर | १८ नोव्हेंबर |
| एक्झिट पोल | २० नोव्हेंबर | |

Scanned with OKEN Scanner

लोकमत पू. पान क्र. ३

# साहेब, कुठेही पार्किंग; यांना दंड कोण करणार?



मंगेश कराळे

नालासोपारा : वसईतील वाढत्या लोकसंख्येबरोबरच दिवसागणिक वाहनांच्या संख्येमध्येही प्रचंड वाढ होत आहे. शहरात कुठेच पार्किंग झोन, वाहनतळ नसल्यामुळे वाहतूक व्यवस्थेचे पूर्णतः तीन-तेरा वाजत असून, नागरिकांची डोकेदुखी वाढली आहे. दिवसेंदिवस शहराचा विस्तार होत असून, लोकसंख्या ३० लाखांच्यावर येऊन ठेपली आहे. आता प्रत्येकाकडे दुचाकी, चारचाकी वाहन आले आहे.

वसई तालुक्यातील नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला फार मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागत आहे. तालुक्यात आजपर्यंत पार्किंग झोन झाले नाही, तर नो पार्किंग झोनही घोषित केलेले नाही. त्यामुळे वाहन चालकांना जिथे जागा मिळेल तेथे वाहने लावावी लागत आहेत. वाहतुकीची समस्या पाहता वाहतूक विभागानेही कारवाई करणे आवश्यक आहे, यातही शंका नाही. मनपाचे पार्किंग धोरण अद्यापपर्यंत कागदावरच आहे.

## महामार्गावरील सर्व्हिस रोडवरही अतिक्रमण

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वसई फाटा, नालासोपारा, तुंगारेश्वर फाटा आणि सातीवली अशा अनेक ठिकाणी असलेल्या सर्व्हिस रोडवर अनधिकृत गॅरेजवाल्यांनी बिनधास्तपणे अतिक्रमण केले आहे.

## दररोज १०० ते १५० दुचाकींवर कारवाई

सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर वाहने उभी असल्यास ती दुचाकी उचलून वाहतूक पोलिस मनपाच्या पाण्याच्या टाकीखाली असलेल्या जागेवर नेतात. दंड भरल्यास ते सोडले जाते. ही कारवाई करताना नियमावली ठरवली आहे. परंतु ती कागदावर असल्याचे दिसून येते.

चौकात व गर्दीच्या ठिकाणी पोलिस वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न करतात.काही ठिकाणी तर वाहन चालकांच्या आठमुठ्या धोरणामुळे तर काहींच्या वाहनांच्या बेशिस्त पार्किंगमुळे कोंडी होते. - वाहतूक प्रशासन

लोकमत पू. पान क्र. ४

# आडणे गावातील खदाण बंद

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : जिल्ह्यातील आडणे गावातील खदाणींना अखेर टाळे लागले असून, ग्रामस्थांनी या विरोधात सुरू केलेल्या लढ्याला यश मिळाले आहे. पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी या खदाणी बंद करण्याचे आदेश दिलेत. या निर्णयामुळे आडणे गावातील निसर्ग धोक्यातून वाचला असून, ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

आडणे-भिनार गावाच्या हद्दीत खदाणी होत्या, ज्यामुळे गावातील पर्यावरण आणि शेतीवर गंभीर परिणाम होत होता. अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्यांचेही मोठे नुकसान झाले होते. या संदर्भात ग्रामस्थ बाळाराम म्हसे यांनी वेळोवेळी महसूल विभागासह जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. ग्रामस्थांनी शेवटी पालघर जिल्ह्यातील जनता दरबारात पालकमंत्र्यांसमोर या प्रकरणी आपली व्यथा मांडली होती. पाठपुराव्यामुळे पालकमंत्र्यांनी तत्काळ निर्णय घेत खदाणी बंद करण्याचे आदेश दिले. या निर्णयानंतर खदाण मालकांनी त्वरित खदाणी बंद केल्या आहेत. आडणे गावातील निसर्ग वाचविण्यासाठी ग्रामस्थांनी केलेल्या संघर्षाला यश आले आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पू.पान क्र. ३

मीरा-भाईंदरकरांनी साजरा केला आनंद

# दहिसर नाक्यावरही कारला टोलमुक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** गेल्या अनेक वर्षांपासून दहिसर टोलनाका येथील टोलचा भुर्दंड आणि टोलनाक्यामुळे होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीने त्रस्त मीरा-भाईंदरच्या नागरिकांना कारचा टोल रद्द झाल्याने दिलासा मिळाला आहे.

दहिसर येथील टोलनाक्यामुळे मीरा-भाईंदरच्या नागरिकांना तसेच मुंबईतून मीरा-भाईंदरमध्ये येणाऱ्या नागरिकांना टोलचा भुर्दंड पडत होता. शिवाय येथे मोठी वाहतूक कोंडी होऊन लोकांचा वेळ आणि इंधन वाया जात होते. मीरा-भाईंदरच्या नागरिकांना या टोलमधून सुटका मिळावी म्हणून आमदार गीता जैन व आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांपासून संबंधित मंत्री आणि शासनाकडे पाठपुरावा केला होता. अधिवेशनात मुद्दा उपस्थित करण्यापासून बैठका व आंदोलनाचे इशारेही त्यांनी दिले होते. टोल हटवण्याबाबत विविध मुद्दे आणि पर्याय मांडले गेले.



दहिसर येथील टोलनाक्यावर कारचा टोल रद्द झाल्यानंतर आ.गीता जैन यांना मिठाई भरवून मीरा-भाईंदरकरांनी आपला आनंद साजरा केला.

गेल्या अनेक वर्षांपासून येथील टोलनाक्याविरोधात विविध राजकीय पक्ष-संघटनांनी आंदोलने केली होती. नागरिकही टोल वसुलीसह वाहतूक कोंडी आणि वेळ-इंधन वाया जात असल्याने संतप्त होते. निवडणुकीच्या तोंडावर का होईना, पण आता चारचाकी वाहनांना टोलमधून वगळण्यात आल्याने या नाक्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. आमदार गीता जैन व समर्थकांनी टोलनाक्यावर जाऊन वाहनचालकांना लाडू वाटून आनंद व्यक्त केला. गेल्या अनेक वर्षांपासूनचा टोल आणि वाहतूक कोंडीच्या जाचामधून मीरा-भाईंदरच्या नागरिकांची सुटका झाल्याबद्दल आ. जैन यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. ज्यांनी शहराचे वाटोळे केले, विकासकामे रोखली त्यांना आता नागरिकांचा टोल माफ झाल्याने मोठी पोटदुखी झाली आहे. त्यांची मळमळ दूर करण्यासाठी जमालगोटा उपलब्ध असल्याचा टोला आ. सरनाईक यांनी लगावला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुती शासनाने नागरिकांच्या कार ना टोलमधून मुक्ती देऊन ऐतिहासिक निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. 5

# मंजुरीपेक्षा जास्त ३ मजले बांधून विक्री

## महापालिकेकडून ओस्तवाल बिल्डरवर गुन्हा दाखल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा-भाईंदर विकासक असलेल्या कुलदीप उमरावसिंह ओस्तवाल यांच्यावर महापालिकेने १६ वर्षांनंतर मंजुरीपेक्षा जास्त वाढीव तीन मजले बांधून विक्री केल्या प्रकरणी अनधिकृत बांधकामाचा काशीमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. विकासकांवर यापूर्वी सुध्दा बनावट कागदपत्रे तयार करून सदनिका विक्री केल्याचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यात आता एमआरटीपीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज या रस्त्यावरील सिल्वर पार्क नाका येथे नवीन सर्व्हे क्रं. १४३ (जुना ४६९ ) ह्या जागेवर महापालिकेने आशादीप को.ऑ. हौ.सो.लि. या इमारतीत विना परवानगी तीन मजल्याचे वाढीव बांधकाम केल्यामुळे संबंधीत विकासकाला महापालिका अधिनियमानुसार २८ जानेवारी २००८ साली नोटीस दिली होती. त्यात जोत्याचा दाखला न घेता त्या जागेवर बांधकाम केल्याने ते बांधकाम अनधिकृत घोषित केले होते. तसेच २००३ सालची बांधकाम परवानगी रद्द करून २००६ साली सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आली होती.

इमारतीला महापालिकेने २००६-०७ मध्ये पार्ट तळ अधिक ४ मजले इतकी परवानगी असताना ती तळ अधिक ७ मजल्यांची बांधली आहे. तसेच त्याची बनावट बांधकाम परवानगीवर सही, शिक्के मारून तयार करून त्यातील सदनिकांची विक्री करत नागरिकांची फसवणूक करून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला आहे. याची तक्रार एका सामाजिक कार्यकर्त्याने महापालिका व पोलीस प्रशासनाकडे केली होती.

महापालिकेच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालक नगररचना यांनी संबंधित प्रभाग अधिकारी यांना ह्यापूर्वी २८ जानेवारी २००८ रोजी आणि १९ मार्च २००८ रोजी मंजूर नकाशावर लाल रंगाने रेखांकित करून दिले होते.

आता पुन्हा ३ ऑक्टोबर २०२४ रोजी रेखांकित करून दिले आहे. त्यानंतर अखेर बिल्डर कुलदीप ओस्तवाल यांनी महापालिकेच्या प्राधिकृत प्राधिकरणाची बांधकाम परवानगी न घेता बांधकाम केल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचा केला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रभाग सहाच्या सहायक आयुक्त कांचन गायकवाड यांच्या फिर्यादी वरून बिल्डर विरोधात एमआरटीपीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धार्मिक भावना भडकविणाऱ्यावर गुन्हा

**मिरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात दोन समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण होईल असे व्हिडीओ तयार करून समाज माध्यमावर व्हायरल केल्याप्रकरणी युट्युब चॅनलच्या दोघांवर काशीगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या युट्यूब चालकांवर या अगोदर सुद्धा २० जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. काशीगाव पोलीस ठाणे हद्दीत दोन समाजात धार्मिक तेढ निर्माण होवू शकते, याची जाणीव असताना सुद्धा काशीमीरा येथे दसऱ्याच्या दिवशी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मुसलमानांनी दुर्गा पूजनाचा केला अपमान, असे कॅप्शन टाकून अर्धवट माहिती घेऊन युट्युबवर व्हिडीओ अपलोड करत प्रसारित केला. यामध्ये युट्यूब चॅनलचे मालक अनमोल संजीव कुमार (२४) रा. शांतीपार्क, मिरारोड आणि हिना ललीतनारायण राय (२३ ) , युटयुब चॅनल रिपोर्टर, रा. शांतीनगर, मिरारोड यांच्या विरोधात काशीगाव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १९६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला नोटीस दिली असून अटक करण्याची तजवीज सुद्धा ठेवली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास उपनिरीक्षक सचिन शेडगे हे करत आहेत.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पू. पान क्र. 1

## ज्वेलर्स दुकानातून चोरी

**पालघर :** विरार आगाशी भागात असलेल्या प्रकाश ज्वेलर्स या दुकानातून सोन्याचे कडे चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या दुकानात बुरखा घालून एक महिला आली होती. दुकानात कोणाचेही लक्ष नसल्याने तिने दोन लाख रुपये जवळपासचे हे कडे हातचलाखी करून ते चोरून नेले. दिलेल्या तक्रारीनुसार बोळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## एमडीसह व्यक्ती ताब्यात

**पालघर :** नायगाव पोलिसांनी केलेल्या कारवाईत ५० हजार रुपयांच्या जवळपासचा एमडी हा अमली पदार्थ निखिल वासानी नामक व्यक्तीकडून हस्तगत केले आहे. नायगाव पोलीस ठाणे हद्दीतील सन्टेक इमारत परिसरातून कच्च्या रस्त्यावर ही व्यक्ती आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्याची झाडाझडती घेतली. त्यावेळी हा अमली पदार्थ आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अमली पदार्थासह इतर असा एकूण एक लाख वीस हजाराच्या जवळपासच्या मुद्देमाल पोलिसांनी त्याच्याकडून जप्त केला आहे.

## स्वीमिंग पूलमध्ये तरुणाचा मृत्यू

**पालघर :** अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीमध्ये असलेल्या एका रिसॉर्टमधील स्वीमिंग पूलमध्ये एका २५ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना रविवारी घडली. दहिसर येथील राहणारा जय राणे हा सहलीसाठी आला होता. रिसॉर्टच्या स्वीमिंग पूलमध्ये उतरल्यानंतर नाका तोंडात पाणी गेल्याने बुडून त्याचा मृत्यू झाला. अर्नाळा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## वसईत मंदिरातून दानपेटी चोरीस

**पालघर :** वसई ६० फूट रस्तास्थित असलेल्या कालिका माता मंदिरातून दानपेटी चोरून नेल्याची घटना घडली आहे. २५००० रुपयांच्या जवळपासची रोख रक्कम या दानपेटीत असल्याचा अंदाज आहे. रविवारी पहाटे दानपेटी चोरून नेल्याचे लक्षात आल्यानंतर दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात चोरट्याविरोधात माणिकपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लोकसत्ता पू. पान क्र. 3

## पत्नीच्या अंगावर डिझेल टाकून जाळले

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** पत्नी सासरी नांदायला येत नाही म्हणून रागाच्या भरात एका इसमाने पत्नीच्या अंगावर डिझेल टाकून तिला पेटवून दिले. नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथे ही घटना घडली.

संतोष भुवन येथील प्रथमेश चाळीत आरोपी सूरज शर्मा (३०) हा पत्नी मोहिनी हिच्यासह रहात होता. काही दिवसांपासून पत्नी कौटुंबिक वादातून घर सोडून गेली होती. वारंवार विनवण्या करूनही ती सासरी येत नव्हती. सूरजने पत्नीला मारहाण करत तिच्या अंगावर डिझेल टाकून तिला पेटवून देण्याचा प्रयत्न केला. गंभीर भाजलेल्या मोहिनीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहिनी हिच्यावर उपचार सुरू आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# विधि अधिकाऱ्यांना पुनर्परीक्षेचा जाच

## मानधनही अपुरे, अट रद्द करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** राज्याच्या गृहविभागाने नियुक्त केलेल्या विधि अधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतरही दर तीन वर्षांनी लेखी परीक्षा घेतली जात आहे. याविरोधात राज्यातील विधी अधिकारी एकवटले असून त्यांनी ही अट रद्द करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

प्रत्येक शासकीय विभागात कायदेशीर मार्गदर्शन आणि सल्ला देण्यासाठी विधि अधिकारी नियुक्त करण्यात येतात. त्यानुसार पोलिसांना कायदेशीर सल्ला देण्यासाठी २००६ मध्ये तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी विधी अधिकारी पदाची निर्मिती केली होती. राज्याच्या प्रत्येक पोलीस आयुक्तालय, पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत आवश्यकेनुसार विधि अधिकारी कंत्राटी पद्धतीने नियुक्त केले जातात. पोलिसांकडून खटले विधीवत दाखल व्हावेत, त्यात कायदेशीर सल्ला आणि प्रशिक्षण मिळावे तसेच गुन्ह्यामध्ये शिक्षेच्या प्रमाणात वाढ व्हावी यासाठी हे विधि अधिकारी कार्यरत असतात. सध्या राज्याच्या गृहविभागात ४७१ विधी अधिकारी काम करतात. मुळात हे पद केवळ तीन वर्षासाठी असते आणि तुटपुंज्या मानधनावर वकिलांना काम करावे लागते. त्यातही तीन वर्ष पूर्ण झाल्यानंतर पुन्हा नियुक्तीसाठी या वकिलांना नव्याने परीक्षा द्यावी लागते. या प्रक्रियेमुळे वकील अपात्र ठरल्यास त्यांना पुन्हा संधी मिळत नाही. त्यामुळे मग पुन्हा वकिली पेशात जाऊन काम करणे शक्य नसते.

मुळात विधि अधिकारी हे कंत्राटी पद्धतीने घेण्यात येतात. तीन वर्षांतही दर ११ महिन्याने कंत्राटाचे नुतनीकरण करण्यात येते. तीन वर्षांनी पुन्हा परीक्षा घेतली जाते. एकदा विधी अधिकारी म्हणून नियुक्त केल्यावर पुन्हा परीक्षा का? असा सवाल महाराष्ट्र पोलीस विधी अधिकारी असोसिएशन (नियोजित) चे अध्यक्ष अॅड. रोहन खाडे यांनी केला आहे.

### शासकीय विभागात भेदभाव

सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील सर्व विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत नियुक्तीनंतर पुनःश्च निवड प्रक्रियेला सामोरे जाण्याची तरतुद केली होती. परंतु त्यास राज्यातील सर्व विभागातील कंत्राटी नियुक्त कर्मचा-यांनी त्यास प्रखर विरोध केल्यामुळे त्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली होती. मग गृहखात्यातील विधी अधिकार्यांनाच ही अट लागू असून तो शासनाच्या अधिनस्त असणा-या दोन वेगवेगळ्या विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यामध्ये भेदभाव करणारा आहे, असेही विधि अधिकाऱ्यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने देखील एका कंत्राटी कर्मचाऱ्याला काढून या ठिकाणी दुसऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याला नियुक्त करता येणार नसल्याचे एका निर्णयान्वये स्पष्ट केले आहे. त्यामुळे गृहखात्यातील विधि अधिकाऱ्यांची पुनर्परीक्षा घेणे हे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होत आहे, असे विधि अधिकाऱ्यांनी सांगितले.

### करार कालावधीत वाढ करण्याची मागणी

गृह विभागातील विधि अधिकाऱ्यांची पुनश्च निवड प्रक्रिया रद्द करावी, सरळ सेवेने उमेदवाराची निवड होईपर्यंत विधि अधिकारी आणि विधि निर्देशक यांचा करार कालावधी वयाच्या ६० वर्षांपर्यंत वाढविण्यात यावा तसेच वाढत्या महागाईप्रमाणे विधि अधिकारी यांचे मानधन २३ हजारांवरून ६० हजार करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# १२ हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई पूर्वेच्या कामण भागात अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या औद्योगिक गाळ्यावर पालिकेने कारवाई केली आहे. या कारवाई १२ हजार चौरस फुटांचे तीन अनधिकृत गाळ्यांचे काम जमीनदोस्त केले आहे.

वसई, विरार शहरातील विविध ठिकाणच्या भागात अनधिकृत बांधकामे सुरूच आहेत. विशेषतः वसई पूर्वेच्या भागात अनधिकृत बांधकामे अधिकच फोफावू लागली आहेत. या वाढत्या अनधिकृत बांधकामामुळे शहर बकाल बनू लागले आहे. या अनधिकृत बांधकामांच्या विरोधात अतिक्रमण विभागाकडून कारवाई केली जात आहे. सोमवारी कामण कुरमुडा पाडा भागात तीन औद्योगिक गाळ्यावर अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली आहे. यात १२ हजार चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त केले. कारवाई अतिक्रमण विरोधी पथकाचे उपायुक्त अजित मुठे, प्रभाग समिती जी च्या सहायक आयुक्त नीता कोरे व त्यांच्या पथकाने केली आहे.



CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 4

# भाईंदरसाठी रस्सीखेच

## भाजपच्या बालेकिल्ल्यावर शिवसेनेचा दावा

**मयूर ठाकूर, लोकसत्ता**

**भाईंदर :** भाईंदर मतदारसंघातून तिकिट मिळविण्यासाठी माजी आमदार नरेंद्र मेहता आणि विद्यमान आमदार गीता जैन यांच्यासह भाजपच्या नेत्यांमध्ये रस्सीखेच असताना आता शिवसेनेने ( शिंदे ) या मतदारसंघावर दावा सांगितला आहे. त्यामुळे भाजपच्या गोट्यात अस्वस्थता पसरली असून पुन्हा मिरा भाईंदरमध्ये भाजप विरुद्ध शिवसेना असा वाद पेटण्याची शक्यता आहे.

मिरा-भाईंदर शहरात गुजराती-जैन-मारवाडी नागरिकांचे प्रमाण वाढल्याने गेल्या काही वर्षांपासून हा भाजपचा बालेकिल्ला बनला आहे. विद्यमान आमदार गीता जैन आणि माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्यासह माजी जिल्हाध्यक्ष रवी व्यास निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. त्यांच्यात तिकिटासाठी रस्सीखेच सुरू असतानाच या मतदार संघावर आता शिवसेना शिंदे गटानेही दावा सांगितला आहे. मिरा-भाईंदरमध्ये उमेदवारीवरून भाजपच्या गोटात सुरू असलेल्या चढाओढीचा फायदा घेऊन ही जागा आपल्या पदरात पाडून घेण्याचा शिंदेंच्या शिवसेनेचा प्रयत्न असल्याचे समजते. शिवसेना शिंदे गटाने ठराव करून शिवसेना विधानसभा प्रमुख विक्रम सिंह यांचे नाव सुचवले आहे. जिल्हाध्यक्ष राजू भोईर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विक्रम सिंग यांच्या नावासंयांसदर्भात पत्र पाठवले आहे.

शिवसेना शिंदे गटाकडून या मतदार संघात राजकीय बांधणी सुरू करण्यात आली आहे. मतदार संघातील आगरी-कोळी मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून यात सामाजिक मंडळांना देणगी देण्यात येत असल्याची बाब मागील काही वर्षांपासून घडत आहे. तर नुकतेच आई धारावी देवी मंदिराच्या पुनर्विकासाला आमदार प्रताप सरनाईकांकडून २५ लाखांची देणगी देण्यात आली होती. याशिवाय शिवसेनेतून इच्छुक उमेदवार म्हणून काम करत असलेले विक्रम प्रताप सिंह उत्तर भारतीय मतदारांना एकत्र आण्याचा प्रयत्न करत आहे.

भोईर यांचे हे पत्र समोर येताच भाजपच्या गोट्यात अस्वस्थता पसरली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत ठाणे लोकसभा मतदारसंघावर भाजपचा उमेदवार देण्याची मागणी मिरा भाईंदर भाजपने केली होती. मात्र ऐन वेळी ही जागा आपल्याकडे कायम ठेवण्यात शिंदे यांना यश आले होते. यावेळी शिवसेना पक्ष भाजपला कमजोर करत असल्याचा आरोप माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी केला होता. परिणामी निवडणुकीत भाजप कार्यकर्त्यांनी शिवसेना उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचाराकडे पाठ फिरवली होती. शिवसेना शिंदे गटाने लोकसभा घेतल्यानंतर आता मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघावरही दावा केल्याने स्थानिक पातळीवरील भाजप नेत्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर मिरा भाईंदर हा भाजपचा बालेकिल्ला असून येथून भाजपचाच उमेदवार निवडणुक लढेल, अशी प्रतिक्रिया जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी दिली आहे.

### गीता जैन यांच्या भूमिकेविषयी संभ्रम

- **शिवसेना शिंदे गटाने या मतदारसंघावर दावा सांगितला असला तरी शिंदे गटाला पाठिंबा देणाऱ्या आमदार गीता जैन यांच्या भूमिकेविषयी मात्र संभ्रम आहे. मूळ भाजपच्या असणाऱ्या गीता जैन यांना २०१९ मध्ये पक्षाने उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली आणि भाजपाच्या नरेंद्र मेहता यांचा १५ हजार ५२६ मतांनी पराभव केला. निवडून आल्यानंतर जैन यांनी भाजपला पाठिंबा जाहीर केला होता.**
- **मात्र, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर त्यांनी शिवसेनेची साथ धरली. शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होताच जैन यांनी शिंदे गटाला पाठिंबा जाहीर केला. परंतु मात्र त्या कधी भाजपच्या बैठकांना तर कधी शिवसेनेच्या कार्यक्रमांना उपस्थित असतात. प्रत्येकाला उमेदवार म्हणून मागणी करण्याचा अधिकार आहे. शेवटी निर्णय वरिष्ठ घेतील.मी अपक्ष म्हणून निवडणुक लढवली होती.आणि आताही महायुती धर्माचे पालन करेने असे गीता जैन यांनी सांगितले.**
- **मिरा-भाईंदरमध्ये उमेदवारीवरून भाजपच्या गोटात सुरू असलेल्या चढाओढीचा फायदा घेऊन ही जागा आपल्या पदरात पाडून घेण्याचा शिंदेंच्या शिवसेनेचा प्रयत्न असल्याचे समजते.**

---

## मंदिरातील दानपेटी चोरणाऱ्याला अटक

**वसई :** वसईच्या प्रसिद्ध कालीमाता मंदिरातील दानपेटी चोरणाऱ्या भुरट्या चोराला माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने चोवीस तासांच्या आत अटक केली आहे. त्याने चोरलेल्या दानपेटीतील सर्वच रक्कम हस्तगत करण्यात यश आले आहे.

वसई पश्चिमेच्या ६० फुटी रस्त्यावर कालीमाता देवीचे मंदिर आहे. दसऱ्यानंतर येथे दुर्गापूजा आयोजित करण्यात आली होती. रविवारी मध्यरात्री या मंदिरातील दानपेटी अज्ञात चोराने पळवून नेली. माणिकपूर पोलिसांनी सीसीटीव्ही तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे २४ तासात समीर गोतर्णे (२१) या आरोपीला अटक केली. तो दिवाणमान डोंगरी येथे राहणारा आहे. या दानपेटीत २५ हजारांची रोकड होती. आरोपीने त्यातील १०० रुपये खर्च केले होते. ही सर्व रक्कम परत मिळविण्यात यश आले आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. ४

# बविआ पालघरमध्ये सहा जागा लढवणार !

## कोअर कमिटीचा निर्णय, वसईमधून पुन्हा हितेंद्र ठाकूर लढणार

**वसई** : पालघर जिल्ह्यात बलाढ्य समजली जाणारी बहुजन विकास आघाडी जिल्ह्यातील सहा विधानसभा लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवाय आ. हितेंद्र ठाकूर यांना वसईतून पुन्हा लढण्याची गळ कोअर कमिटीने घातली आहे.



पालघर जिल्ह्यात तीन आमदार आणि पालिकेवर वर्चस्व असलेल्या बहुजन विकास आघाडीच्या कोअर कमिटीची बैठक मंगळवारी दुपारी पार पडली. बोईसरचे आ. राजेश पाटील, ज्येष्ठ नेते मुकेश सावे, स्थायी समितीचे माजी सभापती जितूभाई शहा, माजी महापौर नारायण मानकर, माजी उपमहापौर उमेश नाईक, माजी महापौर रुपेश जाधव, अजय खोकाणी, माजी खा. बळीराम जाधव, प्रफुल्ल साने, पंकज ठाकूर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. पुढील महिन्यात विधानसभा निवडणूक होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर बैठक घेण्यात आली. जिल्ह्यातील सहा जागांसह राज्यातील ५० जागा लढवण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील बैठका कोकण, सोलापूर, पुणे, नाशिक, अहमदनगर, ठाणे, मुंबई, मराठवाडा येथील कोअर कमिटीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत होणार असल्याचे मानकर यांनी सांगितले. पहिल्या कोअर कमिटीच्या बैठकिला आघाडीचे ज्येष्ठ नेते राजीव पाटील आणि संघटक सचिव अजीव पाटील यांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. राजीव पाटील भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा काही दिवसांपासून सुरू आहे. त्या अनुषंगाने या दोघा पाटील बंधूंची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली. मात्र कुटुंबात दुःखद घटना घडल्यामुळे ते बैठकीला नसल्याचे समजले.

दरम्यान, बविआचे कार्याध्यक्ष राजीव पाटील यांच्या भाजप प्रवेशाबाबत कोअर कमिटीला विचारणा केली असता, याबाबत अद्याप पक्षापर्यंत कुठलीही अधिकृत माहिती नाही. त्यामुळे जर तरच्या गोष्टीवर उत्तर देणे संयुक्तिक ठरणार नाही, असे उमेश नाईक यांनी सांगितले.

सामना पान क्र. 7

# नालासोपाऱ्यात भगवा फडकवण्याचा निर्धार

## शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे जल्लोषात उद्‌घाटन

वसई, दि. १५ (सा. वा.) - नालासोपारा येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन मोठ्या जल्लोषात पार पडले. हे कार्यालय नालासोपारा पश्चिम परिसरातील निळेगावमधील राजीव गांधी शाळेजवळ सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी शिवसैनिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी शिवसैनिकांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला.



वसई आणि विरारमध्ये सत्ताधाऱ्यांना कंटाळून विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश केला आहे. शिवसेनेत होणारे इनकमिंग सुरूच आहे. नालासोपारा येथील विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी भाजप आणि मिंधे गटाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेनेचा भगवा खांद्यावर घेतला आहे. शिवसेनेचा जनाधार या भागात मोठ्या प्रमाणात वाढत चालल्यामुळे नालासोपारा येथील निळेगावातील राजीव गांधी शाळेजवळ जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्‌घाटन पालघर लोकसभा संघटक जनार्दन पाटील आणि जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रवीण म्हाप्रळकर, उपशहरप्रमुख प्रणव खामकर, उपशहरप्रमुख मनोहर पाटील, उपशहरप्रमुख कृष्णा सावंत, जिल्हा युवती अधिकारी ॲड. भक्ती दांडेकर, शहर संघटक पवित्रा चंदा, जिल्हा सचिव प्रतीक जाधव, जिल्हा समन्वयक रोहन पाठारे, शहर सचिव श्रीकांत सणस, शहर सचिव किशोर पाटील, किरण बनसोडे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

म.टा.पु.पान क्र. 1

# अवघ्या ४२ सेकंदांत २१व्या मजल्यावर!

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई - विरार अग्निशमन दलाच्या ताफ्यात जर्मन बनावटीचे ६४ मीटर उंचीचे 'टर्न टेबल लॅडर' वाहन दाखल झाले आहे. त्याचे लोकार्पण सोमवारी पालिकेतर्फे करण्यात आले.

## अग्निशमनच्या ताफ्यात ६४ मीटर उंचीची शिडी



या वाहनावरून लिफ्टच्या सहाय्याने अवघ्या ४२ सेकंदांमध्ये २१ मजल्यापर्यंत पोहोचणे शक्य आहे. त्यामुळे अग्निशमन विभागाला अधिक बळकटी मिळाली आहे.

वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाकडे अत्याधुनिक अशा एकूण ४२ विविध वाहनांचा ताफा आहे. तसेच, महापालिकेकडे २०१२ पासून असलेले ४० मीटर उंचीचे वाहन आजही सुस्थितीत आहे. त्यामुळे या वाहनाचा वापर आतापर्यंत केला जात होता. मात्र नव्या नियमानुसार आता शहरात ७० मीटर उंच इमारतींना परवानगी दिली जात आहे. अशा परिस्थितीत या उंच इमारतींपर्यंत पोहोचण्यासाठी अत्याधुनिक ६४ मीटर उंचीचे 'टर्नटेबल लॅडर' अग्निशमन ताफ्यात समाविष्ट करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवून जर्मनीच्या मे मॅगीरस या कंपनीला खरेदीचा आदेश देण्यात आला. मे २०२४मध्ये पालिका अधिकारी आणि मंत्रालयातील नगरविकास विभागाचे उपसचिव असे पथक जर्मनीला वाहनाची पाहणी करण्यासाठी गेले होते. यावेळी वाहनाची मैदानात चाचणी घेण्यात आली. त्यानंतरच हे वाहन ताफ्यात दाखल झाले आहे.

### ६४ मीटर उंचीची 'टर्नटेबल लॅडर'

हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने विकसित असे अद्ययावत आग प्रतिबंधक व जीव संरक्षक वाहन आहे. या वाहनाच्या साह्याने दुर्घटनास्थळी अग्निशमनासह लोकांना सुखरूप बाहेरही काढता येणार आहे. वाहनावरील वॉटर मॉनिटरद्वारे वॉटर स्प्रे/ वॉटर कर्टनच्या साह्याने आगीची दाहकता कमी करण्यास मदत होईल. चिखलात अडकलेल्या वाहनास बाहेर काढण्यासाठी शिडीला चार हजार किलो क्षमतेचा 'शॅकल' बसविल्याची माहिती आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिली.

# समस्या निवारणाच्या नावाने दीड लाखांचा गंडा

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

पूजाविधी करून कौटुंबिक समस्यांचे निवारण केले जाईल, असे सांगून तीन जणांनी एका तरुणीची दीड लाखांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी नयानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईतील सांताक्रुझ परिसरात राहणारी एक २० वर्षीय तरुणी कौटुंबिक समस्यांमुळे त्रस्त होती. तिने एके ठिकाणी पूजाविधी व इतर पद्धतीने आयुष्यातील समस्या दूर केल्या जातील, अशी जाहिरात पाहिली होती. त्यावर विश्वास बसल्याने तिने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या नंबरवर संपर्क साधला. समस्या निवारणासाठी पूजा करण्याकरिता प्रथम तरुणीकडून एक लाख सात हजार रुपये घेण्यात

## तरुणीला फसवणाऱ्या तिघांवर गुन्हा

आले. त्यानंतर अनेकदा पूजा करण्यासाठी योग्य वेळ नसल्याचे सांगून टाळाटाळ करण्यात आली. त्यानंतर पुन्हा तरुणीकडून ३२ हजार रुपये घेण्यात आले. मात्र त्यानंतरही पूजा केली जात नसल्याने तरुणीला फसवणूक झाली असल्याचे समजून चुकले. त्यानंतर तिने नयानगर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरून मुस्ताक शाह, जावेद व रियाज चौधरी अशा तीन जणांविरोधात जादूटोणा व इतर कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, पोलिसांकडून त्यांचा शोध घेतला जात आहे.

Scanned with OKEN Scanner

N.B.T. पान क्र.5

# 'राजीव पाटील के साथ अन्याय नहीं हुआ, मर्ज़ी से छोड़ रहे पार्टी'

## बहुजन विकास आघाडी ने की अहम बैठक, चुनाव पर हुआ मंथन

■ निज संवाददाता, वसई

मंगलवार को विरार में हुई बहुजन विकास की अहम बैठक में कहा गया कि पार्टी नेता राजीव पाटील के साथ अन्याय नहीं हुआ है। वह अपनी मर्जी से पार्टी छोड़ रहे हैं, क्योंकि उन्हें बेहतर अवसर मिल रहा है। राजीव पाटील उर्फ नाना की बगावत के बाद वसई-विरार में राजनीतिक माहौल गरमा गया है। पार्टी के वरिष्ठ नेताओं ने कहा कि बविआ मजबूती के साथ चुनाव मैदान में उतरने और जीत हासिल करने के लिए संकल्पित है।

बता दें कि हितेंद्र ठाकुर का पिछले 35 साल से वसई-विरार की राजनीति में एकतरफा दबदबा रहा है। पाटील ठाकुर के करीबी रिश्तेदार हैं और पार्टी में नंबर दो नेता माने जाते थे। वह पार्टी के कार्यकारी अध्यक्ष थे और उन्होंने ही पार्टी की स्थापना की थी। अब पाटील ने बीजेपी में शामिल होने का फैसला किया है। इस फैसले से बविआ को बड़ा झटका लगा है। पाटील नालासोपारा विधानसभा सीट से बीजेपी के टिकट पर चुनाव लड़ना चाहते हैं। वह इसके लिए प्रयासरत हैं। अनुमान लगाया जा रहा है कि पाटील के पार्टी छोड़ने से बविआ को बड़ा नुकसान हो सकता है। बविआ के वरिष्ठ नेताओं ने कहा कि पाटील का पार्टी छोड़ना दुर्भाग्यपूर्ण है। पूर्व महापौर नारायण मानकर ने कहा कि पाटील ने अब तक आधिकारिक इस्तीफा नहीं दिया है। पार्टी में बदलाव हो रहे हैं, लेकिन पार्टी खत्म नहीं होगी।



बहुजन विकास आघाडी के नेताओं ने बैठक की।

### राज्य की अन्य सीटें लड़ने पर चर्चा

पूर्व उपमहापौर उमेश नाईक ने कहा कि हमने पालघर जिले के 6 निर्वाचन क्षेत्रों में चुनाव लड़ा और जीता है। उन्होंने कहा कि पदाधिकारियों से बातचीत के बाद राज्य की अन्य सीटों पर चुनाव लड़ने का फैसला लिया जाएगा। पाटील अच्छा मौका मिलने के कारण जा रहे हैं। पार्टी के प्रमुख नेता मुकेश सावे ने कहा कि उन्होंने पार्टी नहीं तोड़ी या अन्याय के कारण नहीं छोड़ी। बैठक में हितेंद्र ठाकुर, विधायक राजेश पाटील, पूर्व सांसद बलिराम जाधव, पूर्व महापौर नारायण मानकर, पूर्व महापौर रूपेश जाधव, पूर्व उप महापौर उमेश नाइक, सगीर डांगे, जीतूभाई शाह, अजय खोखानी, मुकेश सावे, जयेश अजमेरा, प्रफुल्ल साने, रमेश कोटी, डोमिनिक मेनेजेस, पंकज ठाकुर, संदेश जाधव, प्रकाश वनमाली और अन्य बड़े नेता उपस्थित थे।

> "राजीव पाटील ने पार्टी नहीं तोड़ी है और न ही उन्होंने किसी अन्याय के कारण पार्टी छोड़ी है। वह अपनी मर्जी से पार्टी छोड़कर जा रहे हैं। उन्हें अच्छा ऑफर मिला होगा, जिसकी वजह से उन्होंने पार्टी छोड़ने का फैसला किया है।
>
> – मुकेश सावे, प्रमुख नेता

### बैनर से गायब हुई पाटील की तस्वीर



■ निसं, वसई: हितेंद्र ठाकुर के करीबी और वसई-विरार मनपा के प्रथम महापौर राजीव पाटील के बीजेपी में शामिल होने की चर्चा से राजनीतिक सरगर्मी बढ़ी हुई है। कहा जा रहा था कि सोमवार को राजीव राज्य के उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और महाराष्ट्र के बीजेपी अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुले की मौजूदगी में बीजेपी का दामन थाम लेंगे, लेकिन ऐसा हुआ नहीं। राजीव की बीजेपी में जाने की चर्चा से बविआ ने अपने बैनर से उनकी तस्वीरें गायब कर दी हैं।

रविवार को नालासोपारा (पश्चिम) में हुए रंगमंच के उद्घाटन के दौरान राजीव नहीं थे। वहां लगे बैनर में उनकी फोटो भी गायब थी। सूत्रों के अनुसार, पाटील अगर नालासोपारा विधानसभा से चुनाव लड़ते हैं। पाटील ने पिछले कुछ दिनों से नवरात्र उत्सव के दौरान बीजेपी कार्यकर्ताओं के मंडलों का दौरा भी किया।

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

N.B.T. पान क्र. 5

# मांगी गांव जाने के लिए मदद, हुआ अपहरण

■ टीएनएन, मीरा-भाईंदर: राजस्थान के एक किशोर फोटोग्राफर पर मीरा रोड से 19 वर्षीय विवाहित पड़ोसी के अपहरण का आरोप लगा है। इसके बाद उसके पति से पैसे वसूले। बताया जा रहा है कि आरोपी कथित रूप से ऑनलाइन जुए में शामिल था। नई-नवेली दुल्हन माता-पिता से मिलने जाना चाहती थी, लेकिन जब उसके पति और ससुराल वालों ने मना कर दिया, तो उसने अपने गांव पहुंचने के लिए आरोपी की मदद मांगी थी। वह उसे उसके गांव ले जाने के बजाय गुजरात के भरूच ले गया और पति से पैसे वसूले। हालांकि, 24 घंटे के भीतर आरोपी को गिरफ्तार कर लिया गया।

**पड़ोसी ने ही मीरा रोड की महिला को किया था अगवा**



AI Image

पुलिस के अनुसार, घटना 8 अक्टूबर की है, जब महिला और उसकी भाभी गरबा देखने गई थीं। रात करीब 10 बजे भाभी ने महिला को उसकी बिल्डिंग पर छोड़ा और पास स्थित अपने घर चली गई। जब महिला देर रात तक घर नहीं लौटी, तो उसके पति ने अपनी पत्नी और बहन को कॉल किया। महिला का फोन बंद था और बहन ने बताया कि उसने महिला को बिल्डिंग पर छोड़ा था। अगली सुबह लगभग 6:30 बजे पति को पत्नी के सोशल मीडिया अकाउंट से मेसेज मिला, जिसमें उसने कहा कि उसका अपहरण कर लिया गया है। रिहाई के लिए 50,000 रुपये की मांग की गई। पति ने आरोपी के खाते में पैसे ट्रांसफर कर दिए। इसके बाद आरोपी ने और 50,000 रुपये की मांग की, जिससे पीड़ित मीरा रोड पुलिस के पास पहुंचा। पुलिस ने बैंक खाता धारक की पहचान दिनेश सुतार (19) के रूप में की, जो राजस्थान में महिला का पड़ोसी था। सीसीटीवी फुटेज से पता चला कि महिला अपनी मर्जी से आरोपी के साथ गई थी। उन्हें गुजरात के भरूच में ट्रेस किया गया। दिनेश ने पुलिस को बताया कि उसे ऑनलाइन जुआ खेलने के लिए पैसों की जरूरत थी। जब महिला ने उससे राजस्थान ले जाने के लिए मदद मांगी, तो उसने उसका अपहरण कर लिया। महिला ने पुलिस को बताया कि वह इस बात से अनजान थी कि आरोपी उसका अपहरण कर लेगा। पुलिस मामले में आगे की जांच कर रही है।

# लॉलीपॉप दिया जा रहा है: मुजफ्फर




■ निसं, मीरा-भाईंदर: कांग्रेस के महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मुजफ्फर हुसैन ने कहा कि महायुति सरकार आगामी चुनाव में हार के डर से जनता को लॉलीपॉप बांट रही है। उन्होंने प्रेस कॉन्फ्रेंस में कहा कि महायुति सरकार ने राज्य को 8 लाख करोड़ के कर्ज में डाल दिया है। महायुति सरकार ने भ्रष्टाचार के सारे रिकॉर्ड को तोड़ दिए है। प्रेस कॉन्फ्रेंस में जिलाध्यक्ष प्रमोद सामंत, प्रवक्ता प्रकाश नागणे, जय ठाकुर और सीपीआई नेता पुलक चक्रवती भी मौजूद थे। चक्रवती ने आरोप लगाया कि राज्य सरकार ने 5 लाख करोड़ का भ्रष्टाचार किया है।

नवभारत पु. पान क्र. 3

# पीड़ितों को न्याय दिलाओ, आंदोलन

■ वसई, (सं). वसई विरार मनपा वार्ड समिति (जी) के प्रशासन ने एक मेहनती आदिवासी महिला और एक बच्चे की जान ले ली, यह आरोप लगाते हुए उसके विरोध में माफियाओं सहित मनपा प्रभाग समिति जी के अधिकारी सहायक आयुक्तों, उपायुक्तों, इंजीनियरों पर गैर इरादतन हत्या और अत्याचार अधिनियम के तहत मामला दर्ज करने व अट्रोसिटी के तहत मामला दर्ज कर पूरी घटना की जांच उच्च अधिकारियों से कराया जाये. घटना की जांच नायगांव पुलिस स्टेशन से हटाया जाये. इस मांग को लेकर, पुलिस उपायुक्त सर्कल 2 कार्यालय, वसई (प.) में धरना आंदोलन शुरू किया गया है. उक्त आंदोलन अधिवक्ता अनिल चव्हाण व अशोक वर्मा के नेतृत्व में किया जा रहा है. 4 अक्टूबर को कामण में अवैध निर्माण के दौरान एक आदिवासी मजदूर महिला और एक बच्चे की मौत हो गई थी.



Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal Pge-7

# Gaming addict kidnaps newly-wed woman

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

A newly-wed woman was kidnapped on October 9 by a 19-year-old online gaming addict looking for easy money to pay his debt. The woman was abducted under the pretext of being escorted to her native village in Rajasthan. She was rescued within 24 hours (on October 11) by the crime detection unit of the Mira Road police from Bharuch in Gujarat. The abductor, Dinesh Kumar, a local photographer, has been arrested. The complaint was lodged by the woman's husband Kishore Suthar, 30, a carpenter living in the Shanti Park area of Mira Road. As per the complaint, the woman (name withheld) mysteriously went missing while the couple was returning home after watching garba in a nearby locality.

The morning after the abduction, Suthar received a message on Instagram, demanding Rs50,000 to release his wife. Suthar transferred the amount to the specified bank accounts.

**Woman rescued from Bharuch; kidnapper demanded ₹50k from her husband on Instagram**

However, the accused demanded Rs50,000 more, following which Suthar approached the Mira Road police station and lodged a complaint. A team led by assistant police inspector Pravin Bhosale, under the supervision of senior police inspector Chandrakant Sarode, launched a probe. Based on the bank account number and footage captured by CCTV cameras, the identity of the accused was ascertained.

Electronic surveillance revealed Kumar's presence in Bharuch, from where he was arrested with the help of the railway police counterparts. "The accused was in a huge debt due to his addiction to online gaming, which apparently impelled him to commit the crime," said an officer. The accused and the complainant are from the same community and resided in adjacent villages in Barmer, Rajasthan. The reason behind the woman agreeing to go back to her village with the accused is being ascertained. An offence has been registered under section 140 (kidnapping for ransom) and 308 (5) (extortion by putting any person in fear of death/ grievous hurt) of the Bharatiya Nyaya Sanhita (BNS). Kumar has been sent to judicial custody.

MIRA BHAYANDAR

## H'way police now under MBVV cops

For regulation of traffic on the Mumbai-Ahmedabad National Highway, the state government has approved the handover of the post and functioning of the Highway Police Help Centre at Chinchoti in Vasai to the Mira-Bhayandar Vasai Virar Police (MBVV) Commissionerate. The centre had been under the establishment of the highway traffic police department. The transfer request was made by the office of the Director General of Police. The MBVV Commissionerate was established in September 2019 after the division of jurisdictions of Thane Rural and Palghar police units. Mumbai-Ahmedabad National Highway-48, which comes under the jurisdiction of Chinchoti Highway Police Help Centre, falls in its jurisdiction.

MIRA BHAYANDAR

## Centre to empower women

The Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC) has tied up with Kaam.com to launch a Kaamyabi (success) Centre to empower women by providing them with tailored employment opportunities and essential skill development programmes. Key services offered at the centre located in the Indralok area of Bhayandar will include jobseeker assessment and counselling, basic resume development, placement services with job openings across a range of industries, video-based training on personality development and English communication skills. There will also be workshops focused on specific job roles and weekly grooming sessions. The Kaamyabi Center will also work with large corporate houses under various CSR initiatives. Aspirants, employers and those seeking skill development can contact 74001 83943 or email: apply@kaam.com.

Scanned with OKEN Scanner

Time of India Pge - 8, 3

# Teen 'abducts' woman, extorts ₹50k from hubby

Sandhya Nair@timesofindia.com

**Mumbai:** A teenage photographer from Rajasthan, who was allegedly involved in online gambling, 'abducted' his married neighbour from Mira Road and extorted money from her 30-year-old husband. The victim, a newlywed 19-year-old, wanted to visit her parents, but when her husband and in-laws refused, she sought the help of the accused to reach her village. The accused instead of taking the woman to her village, took her to Bharuch in Gujarat, and extorted money before being arrested within 24 hours.

The incident occurred on Oct 8 when the woman and her sister-in-law went to watch garba. Around 10 pm, the sister-in-law dropped the woman at her building and left for her home. When the woman did not return home late at night, her husband, a carpenter, called his wife and sister. The woman's phone was switched off, and the sister informed him that she dropped her off at the building. Despite a search, the woman could not be found.


The next day, around 6.30 am, the husband received a message on his social media account from his wife, claiming she had been kidnapped and the abductor was demanding Rs 50,000 for her release. The husband transferred the money to the accused's bank account through six online transactions. The accused then demanded an additional Rs 50,000 to free her, prompting the husband to approach the Mira Road police. The police identified the bank account holder as Dinesh Sutar (19), who was the woman's neighbour in Rajasthan. CCTV footage revealed that the woman willingly left with the accused. They were traced to Bharuch. Dinesh told the police that he desperately needed money for online gambling. When the woman asked him to take her to her village, he saw it as an opportunity to make quick money.

The woman told the police that she was unaware of his intention to extort money from her husband. The police are investigating the possibility of a prior relationship between the woman and Dinesh before her marriage. Dinesh has been charged with extortion and kidnapping.

# EC clarifies: DGP cleared to stay

Vijay V.Singh
@timesofindia.com

**Mumbai:** The Election Commission has clarified that the appointment of IPS officer Rashmi Shukla as director general of police (DGP) of Maharashtra was approved by the Union Public Service Commission (UPSC), putting an end to any possibility of changes in the state during the ongoing election, as demanded by the Opposition.



Chief election commissioner (CEC) Rajiv Kumar at a press conference on Tuesday said the DGP's appointment is governed by a procedure wherein names of the senior-most officers are sent to the UPSC, which then shortlists the candidate. He also mentioned a Supreme Court decision that outlines the appointment procedure. Kumar said, "This name has been cleared by the UPSC."

Earlier, state Congress chief Nana Patole had written to the CEC, demanding Shukla's removal before the polls, while claiming that her extension would benefit the ruling alliance. Patole questioned her extension saying it contravened legal norms. He argued that extending Shukla's tenure beyond her original retirement date violated the Maharashtra Police Act, which mandates a two-year tenure for the DGP, provided they are not due for retirement in that period.

Last year, the UPSC shortlisted three names for the DGP's post. Shukla, who was due to retire in June, was one of them. In Jan 2024, the state govt appointed her after granting her an extension to enable her to have a minimum tenure of two years.

Scanned with OKEN Scanner

Mid Day Pre-8




# Maharashtra poll showdown

## Political alliances gear up for intense battle; surprises expected after drama surrounding last election

**Continued from page 1**

Chief Election Commissioner Rajiv Kumar announced the Maharashtra schedule, along with the Jharkhand poll programme, on Tuesday afternoon in New Delhi. It will be the second occasion since the summer's Lok Sabha polls that Maharashtra will have two three-party alliances facing each other.

The announcement marked the beginning of the model code of conduct that bars governments from making policy decisions and enforces certain rules and regulations on parties, poll campaigns, candidates and government servants who manage the elections. In exceptional cases, the government may approach the Election Commission, which holds final powers to approve and reject the state plea and direct the government to do what suits it best.

In 2019, polling was also done in a single phase, but a month earlier than this year. Before a stable government took over, the state saw a month of intense political activity after a short-lived government collapsed. This led to unexpected alliances and shifted the state's political direction. 2024's tight schedule will not impact political activity, said state legislature's former principal secretary Anant Kalse.

"The House must be constituted before its term ends. It won't affect if no party or alliance [in the case of a hung House[ is able to form a government in the time available between the results and the House expiry date. The parties may take more time to decide their next course of action [as they did in 2019]," added Kalse.

A stalemate followed after the winning combination of BJP and Shiv Sena (undivided) broke up post-2019 results over Uddhav Thackeray's demand for the CM's post. In the interim, President's Rule was imposed and later lifted when BJP's Devendra Fadnavis and Ajit Pawar of the NCP took oath as the CM and DyCM on November 23, but both quit within three days before the floor test happened. On November 28, the newly formed Maha Vikas Aghadi installed Thackeray as its CM. This government too fell in 2022 in the wake of a rebellion in the Sena. The formation changed into a three-party collaboration when the Ajit Pawar-led NCP splinter joined Sena's Eknath Shinde faction and the BJP.

November 2024 also promises something unexpected. After trailing in the Lok Sabha, the ruling alliance has gone into overdrive to implement a direct cash transfer scheme, and various other dole and social engineering to woo the voters. The Haryana turnaround has raised the BJP's confidence to go all out to emerge as the single-largest party for the third time. The MVA, on the other hand, relies heavily on the recent past, the state's Lok Sabha verdict. But leaving no chances, the Congress, in a bid to cross the Mahayuti, is learnt to have scripted a manifesto full of doles to be given to the people if voted to power. The MVA also banks on quota unrest that has led to confrontation between Marathas and the government. By-poll for Nanded Lok Sabha seat will also be held on November 20. The seat fell vacant after Congress MP Vasant Chavan's death.

***'The House must be constituted before its term ends. It won't affect if no party or alliance is able to form government in the time available between the results and House expiry date'*** Anant Kalse, former principal secretary of Maharashtra legistature

**Assembly constituencies 288**

General: 234, ST: 25, SC: 29

TOTAL VOTERS 9.63 cr

Male 4.97 cr | Female 4.66 cr

Young voters 1.85 cr

Third gender 5,997 | Divyang 6.32 lakh

First-time voters 20.93 lakh

Polling stations 1,00,186

### Candidates with criminal cases

Chief Election Commissioner Rajiv said the candidates with criminal cases and their respective parties will have to advertise at least three times in print and electronic media about their background.

### DGP stays

Responding to a question, CEC Kumar said that the Congress's demand for Maharashtra DGP Rashmi Shukla's displacement will be handled as per the Supreme Court's legal pronouncement in the process of appointment of the state police chiefs. He added that the state DGPs were appointed through a process done by the Union Public Service Commission.

### Maharashtra poll schedule

Date of notification: **October 22**

Last date of nomination: **October 29**

Scrutiny: **October 30**

Withdrawal: **November 4**

Poll date: **November 20**

Counting: **November 23**




Scanned with OKEN Scanner